# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १४/०८/२०२४ (बुधवार) सकाळ

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :– फिर्यादी नामे– सरीता नारायन राजनकर वय २५ वर्ष रा. अशोक नगर, जि अमरावती ह. मु. कळमेश्वर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ७२२/१६ कलम ३०२, १२०(ब), ४५२,३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दि. २१/११/२०१६ चे १२/१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी (मृतकची पत्नी) व मृतक नामे– नारायन पांडुरग राजनकर वय ४३ वर्ष रा. अशोक नगर जि अमरावती ह. मु. कळमेश्वर हे घरी हजर असताना **आरोपी क्र १) नामे–प्रमोद मनोहर बरडे वय ४० वर्ष २) सौ. पुष्पा प्रमोद बरडे वय ३४ वर्ष दोन्ही रा. लोहारा देवी यवतमाळ** मृतकच्या घरी येवुन कट कारस्थान रचुन अर्धा हात लांब असलेल्या काळया रंगाच्या लोखंडी चापट सु–याने फिर्यादीच्या मृतक पतीच्या पोटावर वार करूण खुन केला.

सदर गुन्हयाच्या तपासांतर्गत असे निष्पन्न झाले की मृतक याने पती पासुन विभक्त राहत असलेल्या आरोपी क्र ०२ हिला विधुर असल्याची माहिती सांगुन लग्नाबाबत विचारले व लग्नाबाबत आश्वासन दिले. तसेच मृतकने फिर्यादीशी लग्न केलेबाबतची बाब आरोपी क्र २ पासुन लपवुन ठेवली. मृतक हा आरोपी क्र २ हिला वारंवार फोन करून त्रास देत होता. दरम्यान विभक्त झालेला पति आरोपी क्र १ हा आरोपी क्र २ सोबत राहायला आला तेव्हा रागावरून संगनमत करून खुन करण्याचा कट रचुन घटनास्थळी जावुन मृतकला धारदार लोंखडी सु–याने मारून जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास पोनि सी. व्ही. बहादुरे पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. ॲडॉप डी. जे. आर. जे. पवार मॅडम कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १४/०८/२०२४ रोजी मा. ॲडॉप डी. जे. आर. जे. पवार मॅडम यांनी वरील नमुद आरोपींना कलम ३०२ भादवि मध्ये आरोपी क्र १ व २ यांना आजीवन कारावास व ३०००/–रू दंड. दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावास तसेच कलम १२०(ब) मध्ये दोन्ही आरोपीतांस १४ वर्ष सश्रम कारावास व ३०००/– रू दंड , दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावास. कलम ४५२ भादवि मध्ये ०७ वर्ष सश्रम कारावास व ३०००/–रू दंड ,दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावास. आरोपी क्र १ यास कलम २५ आर्म ॲक्ट मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ३०००/– रू दंड. दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी तपासे साो. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ सुरेद्रसिंग ठाकुर पो.स्टे. कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

# पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीतील लोखंडी सळाखी (लोहा) चोर पोलीसाच्या ताब्यात

दिनांक १६/०६/२०२४ ते १७/०६/२०२४ च्या रात्री दरम्यान यातील फिर्यादी नामे— दिपक सहादेव देशमुख रा. सोमनाडा (शेगाव) ता. भिवापूर हे त्यांचे जुने घर पाडून त्याच ठिकानी नविन घराचे बांधकाम करणे असल्याने बांधकामी करीता आणलेल्या लोखंडी साखळी (लोहा) मधून ८mm लोखंडी सळाखीचे ७ बंडल व १२mm लोखंडी सळाखीचे ३ बंडल प्रत्येकी ६७ कि.ग्रा. चे अशा ३०,०००/— रुपयाचे लोहा कोणी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे भिवापूर येथे अप क्रमांक ३०१/२०२४ कलम ३०३(२) भा.न्यासं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करून तपासात होता.

सदर गुन्ह्याच्या तपासात गुप्त बातमीदाराकडून माहिती काढून अज्ञात आरोपीचा शोध घेतला असता आरोपी मिळून आल्याने **आरोपी नामे १) गणेश महादेव घोसे वय २७ वर्ष रा. दिघोरा भिवापूर ता. भिवापूर जिल्हा नागपूर (२) अविनाश कवडु जांभुडे वय २० वर्ष रा. नागतरोली ता. भिवापूर जिल्हा नागपुर ३) विश्वास बाबुराव जांगळेकर वय २३ वर्ष रा. दिघोरा भिवापूर ता. भिवापूर जिल्हा नागपूर** यांची कसुन चौकशी केली असता गुन्हा केल्याचे सांगितल्याने त्यांना दि. १२/०८/२०२४ रोजी सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील चोरी गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्री. राजा पवार सा. यांचे मार्गदर्शनाखाली मा. पोलीस स्टेशन भिवापूर ठाणेदार जयप्रकाश निर्मल पोना रविंद्र जाधव, पो. अमलदार दिपक ढोले, पो. अमलदार मनोज चाचेरे, पो. अमलदार निकेश आरिकर पोलीस स्टेशन भिवापूर यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर